# भारती वैशंपायन यांचे निधन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** जयपूर अत्रौली घराण्याच्या ज्येष्ठ गायिका, शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. भारती वैशंपायन (वय ६६) यांचे रविवारी निधन झाले. त्यांच्या निधनाने कोल्हापूरच्या सांगीतिक व सांस्कृतिक क्षेत्रातील जाणकार व्यक्तिमत्त्व हरपले.



वैशंपायन यांना मेंदूचा आजार झाला होता. महिन्याभरापासून त्यांच्यावर नागाळा पार्क येथील घरीच उपचार सुरु होते. अखेर रविवारी दुपारी त्यांची प्राणज्योत मालवली. सायंकाळी पंचगंगा स्मशानभूमी येथे त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती अविनाश, मुलगा केदार, सून शीतल, मीरा व मधुरा या दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

मूळच्या सांगलीच्या भारती वैशंपायन यांचा जन्म १ जानेवारी १९५४ चा. विवाहानंतर त्या कोल्हापूरच्या सून झाल्या. त्यांनी हिंदुस्थानी संगीताचे शिक्षण चिंतूबुवा म्हैसकर, पंडित सुधाकरबुवा डिग्रजकर, पंडित निवृत्तीबुवा सरनाईक, पंडित मल्लिकार्जुन मन्सूर यांच्याकडे घेतले. त्यांनी सन १९८२ मध्ये एस.एन.डी.टी. मधून संगीतामध्ये एम.ए. केले. शिवाजी विद्यापीठात संगीत व नाट्यशास्त्र विभाग सुरु करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. त्या सन १९८७ पासून २९ वर्षे या विभागाच्या विभागप्रमुख होत्या. या काळात त्यांनी सतार, व्हायोलिन, कथ्थक, भरतनाट्यम, चित्रकला, शाहिरी, लोककला प्रमाणपत्र कोर्स अशा अनेक कलांचे शिक्षण येथे सुरु केले, या माध्यमातून अनेक शिष्य घडविले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १७ जणांनी पीएच.डी पदवी संपादन केली. यासह त्या विविध विद्यापीठांच्या तज्ज्ञ समितीवर होत्या. वैशंपायन यांनी मराठी संगीत नाटकाच्या परंपरेतही मोलाचे योगदान दिले आहे. त्यांनी 'संगीत शारदा', 'संगीत मानापमान' आणि 'संगीत स्वयंवर' या संगीत नाटकांचे दिग्दर्शन केले. दिल्लीतील ब्रुहनमहाराष्ट्र शैक्षणिक संस्थेच्यावतीने आयोजित स्पर्धेत 'संगीत स्वयंवर' या नाटकाला प्रथम पारितोषिक मिळाले होते. गंधर्व महाविद्यालयाने सन १९८५ मध्ये गंधर्व महाविद्यालयाने त्यांना 'डॉक्टरेट'ने सन्मानित केले.

## वसंत डहाके : सुधीर रसाळ यांचा 'म. सु. पाटील समीक्षा' पुरस्काराने सन्मान

# निष्ठेने समीक्षालेखन करणे गरजेचे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : माणसाच्या जगण्याचे विविध पैलू, त्याच्या जगण्याचे शास्त्र माहीत करुन घेण्याची आवश्यकता समीक्षकाला असते. तथापि, अशी अभ्यास आणि नावीन्यपूर्ण समीक्षा मराठीत अत्यंत अभावानेच लिहिली जाते. ज्ञानव्यवहाराच्या कक्षा बिस्तारित होण्यासाठी निष्ठेने समीक्षालेखन करणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्यावतीने आयोजित 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार' वितरण कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के होते. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात औरंगाबाद येथील ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना ज्येष्ठ साहित्यिक डहाके यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान केला. रोख ५१ हजार रुपये, मानपत्र आणि सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरुप होते.



कोल्हापुरात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना 'डॉ. म. सु. पाटील समीक्षा पुरस्कार' ज्येष्ठ साहित्यिक वसंत आबाजी डहाके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी डावीकडून रणधीर शिंदे, नीरजा धुळेकर, सुमती रसाळ, डी. टी. शिर्के, राजन गवस, विलास नांदवडेकर, नंदकुमार मोरे उपस्थित होते.

म. सु. पाटील यांच्या कुटुंबीयांनी दिलेल्या देणगीतून विद्यापीठाने हा पुरस्कार सुरु केला आहे.

ज्येष्ठ साहित्यिक डहाके म्हणाले, थोर समीक्षकांच्या लेखणीतून मराठी वाङ्मयाला दिशा देण्याचे कार्य झाले आहे. डॉ. रसाळ यांनी लिहिलेले ग्रंथ समीक्षेचे वैभव वाढविणारे आहेत. चांगल्या समीक्षकाला इतिहास, संस्कृती आणि समाजाचे सूक्ष्म आकलन असणे अत्यंत आवश्यक आहे.

वाङ्मयीन व्यवहाराबरोबर समीक्षकाला सामाजिक शास्त्रांचे उत्तम ज्ञानही असावे. प्राचीन भारतीय साहित्यशास्त्राचे नीटसे आकलन करुन त्याचा आजच्या काळाशी अन्वयार्थ लावणे आवश्यक आहे. पाश्चात्त्य सिद्धांताचा स्वीकारही डोळसपणे करायला हवा.

विचारांची स्पष्टता आणि त्यामध्ये तार्किक संगती लावण्याची जबाबदारी ही समीक्षकांची आहे. ज्येष्ठ समीक्षक रसाळ म्हणाले,

### भारतीय वाङ्मय संकल्पना विकसित व्हावी

भारत आणि भारतीय वाङ्मय ही संकल्पना विकसित होण्यासाठी देशातील वेगवेगळ्या प्रांतातील भाषा आपल्यामधील काही लोकांनी आत्मसात केल्या पाहिजेत. ही भाषिक देवाणघेवाण झाल्याशिवाय 'भारतीय' नावाची संकल्पना अस्तित्वात येणार नाही, असे डॉ. रसाळ यांनी सांगितले.

सैद्धांतिक समीक्षा मराठीत फारशी नाही. वापरत असलेल्या संकल्पाचेही साधार विवेचन करीत नाही. मराठी समीक्षा व्यवहारच फारसा गांभीर्याने घेतला गेलेला नाही.

ब्रिटिशांचा आपल्या वाङ्मयातील शिरकाव हा आपल्या वाङ्मयविकासास मारक ठरला. आजच्या समीक्षकांनी मराठी वाङ्मयाची पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. या हेतूने प्रामाणिकपणे काम होण्याची गरज निर्माण झाली आहे.

या कार्यक्रमात म. सु. पाटील लिखित 'साहित्यकृतींचे वाचन आणि निर्वचन' या ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले. कवयित्री नीरजा धुळेकर, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. राजन गवस यांनी मनोगत व्यक्त केले. न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर, डॉ. प्रतिभा कणेकर रमेश वरखेडे, प्रा. अविनाश सप्रे यांनी म. सु. पाटील आणि डॉ. रसाळ यांच्या वाङ्मयीन योगदानाविषयी चित्रफितीद्वारे विचार मांडले.

डॉ. नंदकुमार मोरे यांनी मानपत्राचे वाचन केले. यावेळी सुमती रसाळ, प्रभा गणोरकर, गौतमीपुत्र कांबळे, प्रवीण बांदेकर, कृष्णात खोत बलवंत जेऊरकर, सोनाली नवांगुळ प्रकाश पवार, अवनीश पाटील, किरण गुरव यांच्यासह मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले राजेश पाटील, सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

# विद्यापीठात आजपासून संगीत कार्यशाळेस प्रारंभ

कोल्हापूर (प्रतिनिधी) : शिवाजी विद्यापीठ लोकविकास केंद्र व संगीत व नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'शरद व शिशिर ऋतूतील राग व आधारित गाणी' या विषयावर आज सोमवार (दि. २०) पासून तीन दिवसांची कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. कार्यशाळेत रागातील बंदीशी व निवडक गाणी शिकवण्यात येतील. कार्यशाळेस गायिका व मार्गदर्शक व संगीत विभागप्रमुख, प्रा. डॉ. अंजली निगवेकर मार्गदर्शन करतील, अशी माहिती केंद्राच्या संचालक डॉ. मंजुषा देशपांडे यांनी दिली.

# विद्यार्थ्यांनी सामाजिक दायित्व ओळखावे

## आयुक्त डॉ. कलशेट्टी ; विद्यार्थी विकास विभागातर्फे कार्यशाळा

**कोल्हापूर, ता. १९ :** सकारात्मक विचारांनी प्रेरित होऊन सामाजिक जबाबदारी निभावण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढे यावे, असे आवाहन महापालिकेचे आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागातर्फे विद्यापीठ अधिविभागातील विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन राजमाता जिजाऊ बहुउद्देशीय सभागृहात करण्यात आले होते. उद्घाटनप्रसंगी



**डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी**

'प्रशासनातील नेतृत्व' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आयुक्त डॉ. कलशेट्टी बोलत होते.

कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अध्यक्षस्थानी होते. यावेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. मीनाक्षी गजभिये यांची प्रमुख उपस्थिती होती. विभागाचे प्रभारी संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांनी स्वागत केले.

आयुक्त डॉ. कलशेट्टी म्हणाले, की विद्यार्थ्यांमधील नेतृत्व विकास घडविण्यात शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. कोणत्याही कार्याच्या अंमलबजावणी करण्यामध्ये नेतृत्वाची अत्यंत आवश्यकता असते. एखाद्या कार्याच्या ध्येयपूर्तीकडे जाण्यासाठी, कार्याचे नियोजन, नियंत्रण आणि मार्गदर्शन करण्यासाठी सक्षम नेतृत्वाची निकड भासते. आपल्या कार्याप्रती प्रमाणिक व सकारात्मक राहून समूहामध्ये उत्साह व ऊर्जा निर्माण करण्याचे कौशल्ये असले पाहिजे. डॉ.शिवाजी जाधव यांनी आभार मानले.